# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **ता. ५ डिसेंबर २०१९**

# तक्रारी देण्यासाठी ७ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

**१२ डिसेंबरला ‘तक्रार निवारण शिबीर’ : झोन कार्यालयात दाखल झाल्या अनेक तक्रारी**

**नागपूर, ता. ५ :** आपल्या शहराच्या समग्र विकासासाठी नागरिकांचा सहभाग महत्वाचा असून नागरिकांच्या तक्रारींवर योग्य कार्यवाही होऊन त्यांचे समाधान होणेही आवश्यक आहे. याचदृष्टीने महापौर संदीप जोशी यांच्या संकल्पनेतून तक्रारींच्या निवारणासाठी १२ डिसेंबर रोजी सिव्हील लाईन्स येथील मनपा मुख्यालयाच्या हिरवळीवर ‘तक्रार निवारण शिबीर’ घेण्यात येत आहे. नागरिकांना तक्रारी दाखल करण्यासाठीची मुदत पूर्वी ५ डिसेंबर होती. ती आता वाढवून देण्यात आली असून नागरिक ७ डिसेंबरपर्यंत आपल्या तक्रारी दाखल करू शकतील.

नागरिकांकडून येणा-या तक्रारींवर अनेकदा निर्देश देउनही काही कार्यवाही होत नाही. त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. नागरिकांना त्यांच्या तक्रारीची योग्य आणि अचूक माहिती देऊन

त्यांचे समाधान केल्यास एकाच तक्रारीसाठी त्यांना होणारा मन:स्ताप कमी होईल. याच उद्देशातून 'तक्रार निवारण शिबीर' उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक झोनस्तरावर नागरिकांच्या तक्रारी आमंत्रित करण्यात आल्या आहेत. ७ डिसेंबरपर्यंत नागरिकांना तीन प्रतिमध्ये आपल्या तक्रारी नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक आणि तक्रारीचे सविस्तर वर्णन यासह झोनमध्ये सादर करावयाच्या आहेत. यानंतर या सर्व तक्रारींवर सुनावणी करण्यासाठी १२ डिसेंबरला सिव्हील लाईन्स येथील मनपा मुख्यालयात सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेमध्ये 'तक्रार निवारण शिबीर' आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात नागरिकांच्या तक्रारींचे पूर्णत: समाधान केले जाणार आहे. नागरिकांनी आपल्या तक्रारी झोनमध्ये नोंदविण्याचे आवाहन महापौर संदीप जोशी यांनी केले आहे.